इंडिया फाउंडेशन फॉर दि आर्ट्स (आय एफ ए)

कला अभ्यास कार्यक्रमाअंतर्गत

भारतातील सरकारी अनुदानित आणि ना-नफा शाळांकडून

कला अंतर्भाव प्रकल्प

प्रस्ताव प्रस्तुतीसाठी आवाहन

अर्ज पाठवण्याची अंतिम तारीख: ३० नोव्हेंबर २०२६

कला शिक्षणाद्वारे अध्यापन आणि शिक्षण बळकट करण्यासाठी इंडिया फाउंडेशन फॉर दी आर्ट्स (आय एफ ए) भारतातील महानगरांव्यतिरिक्त इतर भागात असलेल्या सरकारी-अनुदानित आणि ना-नफा शाळांमध्ये कला-अंतर्भाव प्रकल्प राबविण्याचा प्रयत्न करते.

अभ्यासक्रम-आधारित अध्यापनशास्त्रासाठी वेगवेगळ्या कला प्रकारांचा वापर करून शाळांमध्ये शिक्षणाला आनंददायी अनुभव बनवणे हा कला अभ्यास कार्यक्रम कलि-कलिसु (कन्नड मधे 'शिका' आणि 'शिकवा') चा उद्देश आहे.

या कल्पनेला अनुसरून, आय एफ ए सरकारी अनुदानित आणि ना-नफा शाळांकडून प्रकल्प प्रस्ताव आमंत्रित करत आहे. या प्रस्तावांचा उद्देश कला-अंतर्भाव असलेल्या अध्यापनशास्त्रासाठी एक मजबूत पाया तयार करणे आणि विद्यार्थ्यांमध्ये कुतूहल आणि सर्जनशीलता वाढवणे हा आहे.

आमच्या मागील वर्षांच्या काही प्रकल्पांबद्दल अधिक जाणून घेण्यासाठी येथे क्लिक करा.

प्रकल्पांची व्याप्ती:

हे प्रकल्प खालीलपैकी एक किंवा अधिक उद्दिष्टे साध्य करू शकतात:

- स्थानिक कला प्रकार आणि सांस्कृतिक परंपरा वर्गातील शिक्षण आणि अध्यापनात समाविष्ट करणे.
- सर्व विषयांच्या शिक्षण आणि अध्यापन प्रक्रियेत कला समाविष्ट करणे.
- विद्यार्थ्यांचे वर्गातील शिक्षणातील प्रत्यक्ष अनुभव समाविष्ट करणे.
- स्थानिक कलाकार आणि समाजातील संसाधनांसह काम करणे.

प्रकल्पाचा कालावधी: किमान **एक वर्ष** ते जास्तीत जास्त **एक वर्ष आणि सहा महिने**

बजेट (अंदाजपत्रक): कमाल **रु. ४,००,०००/-** (रुपये चार लाख मात्र)

कोण प्रस्ताव पाठवू शकतं?

महानगरांव्यतिरिक्त भागात असलेल्या सरकारी अनुदानित किंवा ना-नफा शाळा. संस्थेने स्थानिक भाषांमधे काम केलेले असले पाहिजे. तसेच कला आणि संस्कृती हे अध्यापन आणि शिक्षणाचा अविभाज्य भाग आहेत यावर त्यांचा विश्वास असायला पाहिजे.

पात्रता:

- सदर शाळा सोसायटीज रजिस्ट्रेशन ॲक्ट १८६० किंवा इंडियन ट्रस्ट ॲक्ट १८८२ अंतर्गत नोंदणीकृत असलेल्या संस्थेच्या मालकीची असली पाहिजे अथवा अशा संस्थेद्वारे संचलित असावी.
- ही शाळा किमान तीन वर्षांपासून अस्तित्वात असली पाहिजे.
- शाळेचे किमान दोन वर्षांचे लेखापरीक्षित लेखा विवरण (ऑडिटेड स्टेटमेंट ऑफ अकाउंट्स) असणे आवश्यक आहे.
- शाळेचा वैध पर्मनंट अकाउंट नंबर (पॅन) असणे आवश्यक आहे.

प्रस्ताव पाठवण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे:
तुम्ही तुमचा प्रस्ताव इंग्रजी किंवा कोणत्याही भारतीय भाषेत लिहू शकता. आय एफ ए इंग्रजी व्यतिरिक्त इतर भारतीय भाषांमधील प्रकल्पांना प्रोत्साहन देते.

तुमच्या अंतिम प्रस्तावात खालील तपशीलांचा समावेश असला पाहिजे:

- प्रकल्पाचे शीर्षक
- उद्दिष्टे / ध्येय / शाळेचा आढावा
- विद्यार्थ्यांची सामाजिक-सांस्कृतिक पार्श्वभूमी
- प्रस्तावित प्रकल्पाची उद्दिष्टे
- कार्यपद्धती आणि तपशीलवार कार्य योजना
- प्रकल्पाचा भाग असलेल्या व्यक्तींची माहिती
- प्रकल्पाच्या मूल्यांकनाची प्रक्रिया
- प्रकल्पाची अपेक्षित निष्पत्ती
- अंदाजपत्रकाचे (बजेटचे) तपशीलवार विभाजन

खालील कागदपत्रे परिशिष्ट म्हणून जोडावी:

- ट्रस्ट डीड / मेमोरँडम ऑफ असोसिएशनची प्रत
- सध्याच्या विश्वस्तांची / सदस्यांची यादी आणि परिचय
- सोसायटीज ॲक्टच्या कलम १२अ अंतर्गत नोंदणीची प्रत
- लेखापरीक्षकाचा अहवाल (ऑडिटर्स रिपोर्ट) / गेल्या दोन वर्षांचा लेखापरीक्षित लेखा विवरण (ऑडिटेड स्टेटमेंट ऑफ अकाउंट्स)
- संस्थेच्या पर्मनंट अकाउंट नंबरची (पॅनची) प्रत
- मागील किंवा सध्याच्या कला शिक्षण उपक्रमांची माहिती (असल्यास)

जर शाळेला अंतिम प्रस्ताव पाठवण्यापूर्वी प्रकल्पाच्या कल्पनांवर चर्चा करायची असेल किंवा त्याबाबत काही प्रश्न असतील, तर कृपया दीपक यांना deepak@indiaifa.org या ई-मेल वर किंवा (सकाळी १० ते संध्याकाळी ५ दरम्यान) **9739175525** या नंबरवर **३१ ऑक्टोबर २०२६** च्या आधी संपर्क साधा.

अंतिम प्रस्ताव, सर्व परिशिष्टांसह, **३० नोव्हेंबर २०२६** रोजी, किंवा त्यापूर्वी, २५ एमबी पेक्षा कमी असलेल्या एकाच ई-मेलद्वारे deepak@indiaifa.org यांना पाठवावा.

कृपया नोंद घ्या की अपूर्ण प्रस्ताव आणि अर्जदार पात्रता निकषांमधे न येणारे प्रस्ताव विचारात घेतले जाणार नाहीत.

निवड प्रक्रिया: एक बाह्य पॅनेल शॉर्टलिस्ट केलेल्या प्रस्तावांचे मूल्यांकन करेल आणि अर्जदारांना त्यांचे प्रकल्प पॅनेलसमोर सादर करावे लागतील. प्रकल्प निवडीबाबत IFA (आय एफ ए) चा निर्णय अंतिम असेल.

निवडलेले सर्व प्रकल्प आय एफ ए तर्फे राबवले जातील.

महत्त्वाच्या तारखा:

- प्रकल्पाचे मसुदे सादर करण्याची अंतिम तारीख आणि प्रकल्पाबाबतच्या प्रतिक्रिया, शंका किंवा प्रश्नांवर चर्चा करण्याची अंतिम तारीख: **३१ ऑक्टोबर २०२६**
- अंतिम प्रस्ताव पाठवण्याची अंतिम तारीख: **३० नोव्हेंबर २०२६**
- निवडलेले प्रकल्प जाहीर करण्याची तारीख: **जानेवारी २०२७**

कृपया लक्षात घ्या: मुलांसह सर्वांना साहाय्य दिले जाईल, सर्वांचा आदर केला जाईल आणि सर्वांचे संरक्षण केले जाईल असे सुरक्षित वातावरण निर्माण करण्यासाठी आय एफ ए वचनबद्ध आहे. अर्जदाराने सुद्धा हे पाळणे अनिवार्य आहे.